महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग ,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२, मुंबई -४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२ २२७९३१६८ Email ID: sm3.sesd-mh@gov.in

क्रमांक-संकीर्ण-२०२३/प्र.क्र.३५/२३/एसएम-३ दि. १३ जुलै, २०२३

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

विषय :- सन २०१२ पूर्वी देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाणपत्राच्या आधारे सुरु असलेल्या शाळांच्या मान्यतेबाबत.

संदर्भ:- नाहप्र-२०१३/(७५/१२)/माशि-१,दि. ०२/०८/२०१३.

उपरोक्त विषयावरील अधिकृत स्वाक्षरीकर्ता, बाल सेवा इंग्लिश मेडीयम स्कूल, स्वामी विवेकानंद नगर, कालाखडक, वाकड, पुणे यांचे दि. २३/०६/२०२३ रोजीच्या पत्राची प्रत सहपत्रासह यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. बाल सेवा एज्युकेशन सोसायटी, स्वामी विवेकानंद नगर, वाकड, जि. पुणे संचलित बाल सेवा इंग्लिश मेडीयम स्कूल, मु. वाकड, जि. पुणे या शाळेस क्र.एनओसी २०१०/(२११/१०)/एसई-१, दि. २५/०३/२०१० पत्रान्वये इयत्ता ८ वी ते १२ वी करीता सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्न होण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तसेच शासन पत्र क्र.एनओसी ४३१४/प्र.क्र.२१/एसएम-२, दि.०४/०३/२०१४ च्या पत्रान्वये सदर शाळेस इयत्ता १ ली ते १२ वी च्या वर्गास सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्न होण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. आता सदर शाळेस प्रथम मान्यता देण्याची विनंती संस्थेने उपरोक्त पत्रान्वये केली आहे.

३. त्यानुषंगाने कळविण्यात येते की, शासनस्तरावरुन तात्पुरत्या व कायमस्वरूपी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या व सद्यस्थितीत शासन परवानगीशिवाय सुरु असलेल्या विवक्षित शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १८ व १९ अन्वये विहीत केलेले निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असतील तर अशा शाळांना शासन स्तरावरून परवानगी आहे, असे गृहीत धरून मान्यता देण्याची कार्यवाही संबंधित शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावरून करण्याबाबतच्या सूचना संदर्भाधीन दि.०२/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. तरी, त्याअनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी नियमानुसार आवश्यक कार्यवाही करावी, ही विनंती.

(आ.रा. राजपूत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीकरीता अग्रेषित:-

१) मुख्याध्यापिका, बाल सेवा इंग्लिश मेडीयम स्कूल,स्वामी विवेकानंद नगर, कालाखडक, वाकड, जि. पुणे.
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.